# *मराठी साहित्य मंडळ*

## *कार्यकारिणी*

अध्यक्ष : प्राचार्य प्रा. सुनिल मंत्री

उपाध्यक्षा : प्रा. मंजिरी गोंधळेकर

कार्यवाह : श्रध्दा निंबरे

## अहवाल

२०१०-११ या शैक्षणिक वर्षाकरिता मराठी साहित्य मंडळाच्या उपक्रमांचे उद्‌घाटन श्रीमती कविता हेमंत करकरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात गणेशवंदन व दीपप्रज्वलनाने झाली.

प्रास्ताविक भाषणात उपाध्यक्षा प्रा. मंजिरी गोंधळेकर यांनी या कार्यक्रमाचा उद्देश 'सामाजिक बांधिलकी'ची जाणीव करुन देणे, स्वराष्ट्रधर्म, स्वभाषा आणि स्वधर्म अशी 'स्व'ची उतरंड आहे असे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती कविता हेमंत करकरे यांनी आपले पती श्री. हेमंत करकरे यांची हुशारी, देशप्रेम आणि प्रत्येक गोष्ट करण्यामागची मेहनती आणि चिकित्सक वृत्ती यांच्या आठवणी सांगितल्या. परंतु त्यांच्या पतीच्या मृत्यूनंतर संवेदनाहीन प्रश्न विचारणा-या पत्रकारांबद्दल त्यांनी चीड व्यक्त केली. पण अशा समाजाच्या संवेदना जागृत करण्याचे काम हे युवक करु शकतात असा विश्वास व्यक्त केला. या भाषणानंतर ''गौरव राष्ट्राचा'' हा ओजस्वी मराठी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यात सुनयना सावंत, श्रध्दा निंबरे, अस्मिता तेंडोलकर, ओंकार खांडेकर, वरुण बिडये या विद्यार्थ्यांबरोबरच प्रा. सविता देसाई आणि प्रा. गीता देसाई यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. या कार्यक्रमाचे निवेदन रुई जाधव व रुपाली दामले या विद्यार्थीनींनी केले. मंडळाची कार्यवाह श्रध्दा निंबरे व सदस्या कल्याणी मोरे यांनी तुळशीरोप देऊन पाहुण्यांचे आभार मानले.

दुसरे सत्र सर्वांना घेऊन गेले 'इये मराठीचिये नगरी' . या कार्यक्रमाची सुरुवात झाली 'मराठमोळया' खाद्य पदार्थांच्या पाककृती स्पर्धेने. मराठी लोकांची खासियत असलेले मोदक, गुळपोळी, उपवासाची

मिसळ, थालीपीठ हे पदार्थ स्पर्धेत सादर करण्यात आले. स्पर्धेचे परिक्षण केले प्रा. दीपा चिटणीस यांनी. गोड पदार्थात पहिला क्रमांक मिळाला, अस्मिता तेंडोलकर हिने केलेल्या 'मोदकाला' आणि तिखट पदार्थात पहिला क्रमांक मिळाला, सुनयना सावंत हिच्या 'उपवासाच्या मिसळीला'.

यानंतर मराठी शुध्दलेखन स्पर्धा घेण्यात आली. एकूण ३ स्पर्धकांनी भाग घेतलेल्या स्पर्धेत श्रध्दा निंबरे आणि पार्थ देसाई यांना पहिला क्रमांक विभागून मिळाला. या स्पर्धेचे परिक्षण केले प्रा. केदार भिडे यांनी.

विद्यार्थ्यांना वाचिक अभिनयाची ओळख करुन देण्याकरिता मराठी नाटयउतारावाचन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण ५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेत प्रथम आणि द्वितीय क्रमांक अनुक्रमे श्रध्दा निंबरे आणि सुनयना सावंत यांनी पटकाविला. स्पर्धेचे परिक्षण केले प्रा. निर्मला चव्हाण आणि प्रा. प्रविण काकडे यांनी.

ज्वलंत विषयावरील विचारांना व्यासपीठ मिळवून देण्याकरीता वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत 'अवकाळी पाऊस आणि शेतक-यांच्या आत्महत्या' या विषयावर आपले विचार कळकळीने मांडणा-या पार्थ देसाईला प्रथम क्रमांक मिळाला. आनंदवन या पुस्तकाचे परिक्षण करुन रुपाली दामले हिने सुद्धा पहिल्या क्रमांकावर आपला हक्क शाबित केला. एकूण ४ स्पर्धकांनी भाग घेतलेल्या या स्पर्धेचे परिक्षण केले प्रा. सुनिल कदम यांनी.

रसिकांना काव्यरसास्वादाचा आनंद देण्याकरिता मराठी काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. परिक्षक होत्या प्रा. सविता देसाई आणि प्रा. गीता देसाई. या स्पर्धेत श्रध्दा निंबरे हिने प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली.

उच्च दर्जाचे लेखनमूल्य असलेल्या आणि राष्ट्रीय पारितोषिक विजेत्या 'जोगवा' चित्रपटाच्या प्रक्षेपणाने 'इये मराठीचिये नगरी', कार्यक्रमाने सर्वांना रामराम केला.

हया कार्यक्रमात अमराठी प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचा सहभाग होता. पार्थ देसाई याने दोन स्पर्धेत विभागून प्रथम क्रमांक मिळवून हे सिद्ध केले.

-----------------------